## रे.दि.मु. क्रमांक 284/2012 मधील निशाणी क्रमांक 5 वरील आदेश

1. वादींनी सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्रमांक 1 चे विरूध्द दावा मिळकती हस्तांतर करू नये व कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. सदरचा अर्ज व म्हणणे वाचले. वादींनी कथन केले आहे की, दावा मिळकती या प्रतिवादी क्रमांक 1 चे वडीलांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीची होत्या. त्यांनी दावा मिळकतीचे साठेखत दिनांक 07/09/1995 रोजी वादी व प्रतिवादी क्रांक 2 यांना करून दिले. त्यावेळी, दावा मिळकतीचा कब्जा वादी व प्रतिवादी क्रमांक 2 यांना दिलेला आहे. प्रतिवादी क्रमांक 1 चे वडील मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांची मिळकतीस नोंद झाली आहे. वादी व प्रतिवादी क्रमांक 2 यांनी प्रतिवादी क्रमांक 1 यास भेटुन खरेदीखत करून देण्याची विनंती केली. परंतु, त्यांनी टाळाटाळ केली. दावा मिळकतीमध्ये कब्जा असल्याने वादींनी जास्त तगादा लावला नाही. प्रतिवादी क्रमांक 1 हा दावा मिळकत विक्री करण्यासाठी ग्राहक शोधत आहे असे कळल्यानंतर खरेदीखत करून देण्याची विनंती केली असता, त्याने साफ नकार दिला, म्हणुन सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

3. प्रतिवादी क्रमांक 1 ने सदर अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही.

4. वरील सर्व बाबी वरून सदर अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुददे निघत असुन त्यावरील निष्कर्ष सकारण पुढीलप्रमाणे :–

| अ.क. | मुदद्े | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | वादींनी त्याच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे शाबित केले आहे का ? | नकारार्थी |
| 2 | वादींनी त्याच्या हक्कात सोईचा समतोल असल्याचे शाबित केले आहे का ? | नकारार्थी |
| 3 | सदर अर्ज नामंजुर झाल्यास अपरिमित नुकसान होईल असे वादींनी शाबित केले आहे का ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| 4 | काय आदेश ? | अंतिम<br>आदेशाप्रमाणे |

## –: <u>कारणमिमांसा</u> :–

5. वादींनी सदरच्या अर्जाच्या पृष्टयर्थ निशाणी 3/1 ते 3/3 वर दावा मिळकतीचे सातबारा उतारे, व निशाणी 3/4 वर नोंदणीकृत साठेखत दाखल केले आहे. या विरूध्द प्रतिवादीने कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत.

6. वादींतर्फे विधीज्ञ श्री. वाय.एस. पेंढारकर यांचा युक्तीवाद ऐकला, प्रतिवादी क्रमांक 1 व त्याचे विधीज्ञ पुकारले असता, गैरहजर राहिले.

7. **<u>मुददा क्रमांक 1 ते 3 बाबत</u>** :–

वादींच्या विधीज्ञांनी जोरदार युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रमांक 1 च्या वडीलांनी दावा मिळकतीचे साठेखत करून कब्जा वादी व प्रतिवादी क्रमांक 2 यांना दिलेला असुन प्रतिवादी क्रमांक 1 हा खरेदीखत करून देण्यास टाळाटाळ करीत आहे. तसेच, तो दावा मिळकती तबदिल करण्याच्या विचारात आहे.

8. निशाणी क्रमांक 3/4 वरील साठेखत पाहता, प्रतिवादी क्रमांक 1 च्या वडीलांनी वादी व प्रतिवादी क्रमांक 2 यांना दावा मिळकतीचे साठेखत करून देवुन कब्जा दिला असल्याचे दिसुन येते. सदर दस्त हा सन 1995 चा आहे. त्यानंतर, निशाणी 3/1 ते 3/3 वरील सातबारा उतारे पाहता, त्यावर मालक व जमिन करणा–याचे नांव म्हणुन प्रतिवादी क्रमांक 1 व इतर लोकांची नोंद असल्याचे स्पष्ट होते. सदर सातबारा उतारे हे सन 2011–12 सालचे आहेत. याचाच अर्थ दावा दाखल करताना प्रतिवादी क्रमांक 1 व इतर लोकांचा दावा मिळकतीमध्ये कब्जा होता. सन 1995 पासुन दावा मिळकतीमध्ये वादींचा कब्जा आहे असा दाखविणारा साठेखताशिवाय दुसरा कोणताही कागद अभिलेखावर नाही. तसेच, वादी व प्रतिवादी क्रमांक 2 यांनी प्रतिवादी क्रमांक 1 च्या वडीलांच्या हयातीत खरेदीखत का करून घेतले नाही याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर दिलेले नाही. तसेच, खरेदीची रक्कम पुर्ण अदा केलेली असतानासुध्दा साठेखताच्यावेळी खरेदीखत का केले नाही याचेसुध्दा संयुक्तिक कारण दिलेले नाही. सद्य परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्रमांक 1 हा दावा मिळकतींचा मालक व वहिवाटदार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, प्रथमदर्शनी प्रकरण व सोयीचा समतोल वादींच्या हक्कात नाही.

तसेच, सदर अर्ज नामंजुर झालेस वादींचे अपरिमित नुकसान होईल असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्रमांक 1 ते 3 यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

## आदेश

सदरचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

पाटण
दिनांक – 11/12/2013

(शशिकांत रा. मोकाशी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर पाटण